प्रेस नोट दि. २४/०४/२०२५

आरोपी लोकसेवक श्री. आलोसे श्री. संतोष राजाराम चौधरी, वय- ४६ वर्षे, व्यवसाय- जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा कृषी विभाग, सांगली वर्ग - २. यांनी तक्रारदार यांचेकडून ३५,०००/- रूपये लाचेची मागणी करून ३०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली विभागाची कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | सांगली |
| पोलीस स्टेशन | विश्रामबाग पोलीस ठाणे, जि.सांगली |
| गुन्हा नोंद क्रमांक व कलम | गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरू आहे. |
| तक्रारदार | पुरुष वय ३१ वर्षे, |
| आरोपी लोकसेवकाचे नांव व कार्यालय | श्री. संतोष राजाराम चौधरी, वय- ४६ वर्षे, व्यवसाय- जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा कृषी विभाग, सांगली , वर्ग - २, रा. फ्लॅट नं.४०४, गणेशनमन अपार्टमेंट, धामणी रोड सांगली. मुळ रा. गलांडेवाडी नं. १, ता. इंदापुर, जि.पुणे |
| पडताळणी कारवाई वेळी मागणी केलेली लाचेची रक्कम व दिनांक | ३५,०००/- (पस्तीस हजार) रुपये लाचेची मागणी<br>दि.२३.०४.२०२५ रोजी आलोसे यांचे कक्षामध्ये तडजोडीअंती मागणी ३०,०००/- ( तीस हजार ) |
| सापळा कारवाई वेळी स्विकारलेली लाचेची रक्कम | ३०,०००/- (तीस हजार) रुपये लाचेची मागणी |
| सापळा कारवाई दिनांक व ठिकाण | दि.२४/०४/२०२५ रोजी जिल्हा कृषी विभाग, सांगली येथील आलोसे यांचे कक्षामध्ये |
| थोडक्यात हकीकत | यातील तक्रारदार यांनी तळेगाव एमआयडीसी येथे प्लॉट नंबर बी-८४, शिवाजीनगर येथे शेती औषधाची कंपनी सुरु करणेकामी सन २०२३ मध्ये एमआयडीसी कडेगाव सोबत करार केला आहे. एमआयडीसी कडेगाव यांनी दिलेल्या जागेवर तक्रारदारांनी पॅरागॉन ॲग्री केअर या नावाची शेती औषध कंपनी स्थापन करुन त्याचे बांधकाम पूर्ण करुन दि. १६/०७/२०२४ रोजी बिल्डींग कम्प्लीशन सर्टिफिकेट (DRC) मिळणेकामी एका खाजगी एजंटामार्फत दि. २२/०४/२०२५ रोजी फाईल तयार करुन घेतली होती. सदर सर्टिफिकेट प्राप्त करणेकरीता सदर फाईल पुणे येथील ऑफिस मध्ये पाठवावी लागते. तत्पूर्वी जिल्हा कृषी विभाग सांगली यांचेकडून सदर इमारतीचे इन्स्पेक्शन करुन रिपोर्ट प्राप्त करावा लागतो. सदर इन्स्पेक्शन रिपोर्ट मिळणे कामी यातील तक्रारदार दिनांक २३/०४/२०२५ रोजी जिल्हा कृषी विभाग सांगली येथे गेले असता वर नमूद आलोसे यांनी कंपनीच्या इमारतीचा इनस्पेक्शन रिपोर्ट देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे ३५,०००/- रुपये लाचेची मागणी केलेबाबतचा अर्ज तक्रारदार यांनी दि.२३.०४.२०२५ रोजी पथकास दिला होता.<br>तक्रारदार यांनी दिले लाच मागणी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने दि.२३.०४.२०२५ रोजी आलोसे संतोष राजाराम चौधरी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा कृषी विभाग, सांगली यांचेकडे पडताळणी केली असता, आलोसे यांनी तक्रारदारांच्या औषध कंपनीच्या इमारतीचा इनस्पेक्शन रिपोर्ट प्रत्यक्षात इनस्पेक्शन न करता रिपोर्ट देण्याकरीता प्रथम ३५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ३०,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यानंतर दि. २४.०४.२०२५ रोजीचे सापळा कारवाई वेळी यातील आलोसे यांनी त्यांचे कक्षामध्ये तक्रारदार यांचेकडून ३०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. त्या अनुषंगाने आलोसे श्री. संतोष राजाराम चौधरी, वय- ४६ वर्षे, व्यवसाय- जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा कृषी विभाग, सांगली , वर्ग - २ यांचे विरूध्द विश्रामबाग पोलीस ठाणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे. |
| तपास अधिकारी | श्री. उमेश दा. पाटील, पोलीस उप अधीक्षक ला. प्र. वि. सांगली |
| मार्गदर्शन अधिकारी | पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे,<br>अपर पोलीस अधीक्षक डॉ. शितल जानवे,<br>अपर पोलीस अधीक्षक श्री.विजय चौधरी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे |
| सापळा पथक | श्री. उमेश पाटील, पोलीस उप अधीक्षक, सांगली, पोलीस निरीक्षक, श्री किशोर कुमार खाडे, पोलीस निरीक्षक श्री.विनायक भिलारे तसेच पोलीस अंमलदार प्रीतम चौगुले, अजित पाटील, ऋषिकेश बडणीकर, पोपट पाटील, उमेश जाधव, सुदर्शन पाटील, सलीम मकानदार, रामहरी वाघमोडे, धनंजय खाडे, सीमा माने, चंद्रकांत जाधव,वीणा जाधव, चालक विठ्ठलसिंग रजपत. |

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप व मोबाईल नंबर ९५५२५३९८८९ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :- मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

(उमेश दा.पाटील)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली

Scanned with OKEN Scanne

Scanned with OKEN Scanner